# शेतकरी संघटक

वर्ष १२ वे
अंक ४ था
२१ जून १९९५
पाक्षिक
वार्षिक वर्गणी रु. ३०
किंमत १ रुपया २५ पैसे

शेतकरी महिला आघाडी

## विस्तारीत कार्यकारिणी बैठक
३/४ जून १९९५
## वृत्तांत

शेतकरी संघटना

शेतकरी संघटनेच्या विस्तारीत कार्यकारिणीची बैठक ३ व ४ जून १९९५ रोजी आंबेठाण येथे अंगारमळ्यात पार पडली.

फेब्रुवारी ९५ मध्ये झालेल्या निवडणुकीत शेतकरी संघटनेने स्वतंत्र भारत पक्षाच्या माध्यमातून घेतलेला व्यापक सहभाग, या निवडणुकांचे मार्चमध्ये लागलेले निकाल आणि त्यात स्वतंत्र भारत पक्षाला स्वीकारावे लागलेले प्रचंड अपयश, मुंबईत स्थापन झालेले जातीयवादी युतीचे सरकार या पार्श्वभूमीवर आणि विशेषतः जीवघेण्या आजारातून बाहेर पडून विश्रांती व औषधोपचार घेत असलेल्या आपल्या नेत्याची भेट घेण्याच्या इच्छेने अशा एखाद्या बैठकीची कार्यकर्ते मोठ्या आतुरतेने वाट पाहात होते. त्या दृष्टीने या बैठकीला एक विशेष महत्त्व होते. परिणामतः, या बैठकीला हजर राहाण्यासाठी कार्यकर्ते २ जूनच्या रात्रीपासूनच अंगारमळ्यात दाखल होऊ लागले. ३ जूनच्या दुपारपर्यंत सुमारे साडेतीनशेच्या वर कार्यकर्ते जमा झाले.

३ जून रोजी दुपारी ठीक २ वाजता बैठक सुरू झाली. अध्यक्ष श्री. पाशा पटेल यांनी सभेची सुरुवात करून कार्यकर्त्यांना व कार्यकारिणीच्या मान्यवर सदस्यांना, वर्तमान परिस्थितीचा आढावा घेऊन शेतकरी संघटनेची पुढील वाटचाल आखण्याच्या दृष्टीने सूचना करण्याची विनंती केली.

माजी अध्यक्ष सर्वश्री. भास्करराव बोरावके, रामचंद्र बापू पाटील, किशोर माथनकर तसेच श्रीरंगनाना मोरे, डॉ. मानवेंद्र काचोळे, मोरेश्वर टेमुर्डे, शेतकरी महिला आघाडीच्या अध्यक्षा सौ. सरोज काशीकर यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी आपले विचार याप्रसंगी मांडले. विधानसभा निवडणुकांच्या निकालाने 'खचलेपणा'ची भावना कोणाच्याही मनात निर्माण झाल्याचे भाषणांतून जाणवले नाही. परंतु निवडणुकीच्या निमित्ताने आपले विचार आपण सर्वसामान्य मतदारांसमोर ठेवण्यासाठी लाभलेल्या संधीचा आपण पुरेपूर वापर करू शकलो नाही आणि याला अभ्यासाचा अभाव हे प्रमुख कारण असल्याचे व त्याबद्दल खंत वाटत असल्याचे जाणवले.

सायंकाळी चार वाजता शरद जोशींनी सर्व कार्यकर्त्यांनी मांडलेल्या विचारांचे संकलन करून निवडणूक निकालाबद्दल आपले मत व्यक्त केले. 'यशाचे पितृत्व घ्यायला बरेच जण धडपडतात, अपयश मात्र पोरकेच राहाते, त्याचं पितृत्व स्वीकारायला कोणी पुढे येत नाही' अशी सुरुवात करून सर्वप्रथम गेल्या निवडणुकीतील अपयशाची जबाबदारी आपली असल्याची स्वीकृती देऊनच त्यांनी आपल्या भाषणाला सुरुवात केली. 'आपल्या बाजूने राहिले म्हणजे लोक भले आणि आपल्या बाजूने राहिले नाहीत तर अडाणी, मूर्ख' असली पुढारी-छाप वृत्ती संघटनेच्या कार्यकर्त्यांनी तरी ठेवू नये असे सांगून 'लोक जर आपल्या बाजूने आले नाहीत तर आपले काहीतरी चुकते आहे असे समजून ती चूक दुरुस्त करण्याचा प्रयत्न केला पाहिजे,' असे त्यांनी आपल्या भाषणात म्हटले. शेतकरी संघटनेने शेगाव मेळाव्यापासून जाहिर केलेल्या वेगवेगळ्या कार्यक्रमांच्या बाबतीत शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते अगदी अपवादानेच क्रियाशील राहिले याबाबत त्यांनी कार्यकर्त्यांवर परखड टीका केली.

शरद जोशींनी आपल्या भाषणात देशातील व विशेषतः राज्यातील राजकीय, आर्थिक परिस्थितीचा आढावा

घेतला. जगभर सुरू असलेल्या खुल्या अर्थव्यवस्थेच्या चळवळीत एक ना एक दिवस आपल्या देशाला पूर्णार्थाने सामील व्हावेच लागेल. त्याशिवाय, तरणोपाय नाही. पण अशा देशाचे नेतेपण — चालकत्व देशातील सर्वात मोठा उद्योजक म्हणून शेतकऱ्याकडेच राहाणार आहे; त्यासाठी त्याच्यातील जाणीव जागृत करणारे कार्यक्रम संघटनेच्या कार्यकर्त्यांना हाती घ्यावे लागतील असे त्यांनी सांगितले.

या बैठकीचे पहिले सत्र सायंकाळी ६ वाजता संपले व दुसरे सत्र रात्री ८ वाजता सुरू झाले.

रात्रीच्या या सत्रात शेतकरी संघटना व शेतकरी महिला आघाडीच्या अध्यक्षांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहिर करण्यात आला. शेतकरी संघटनेच्या अध्यक्षपदासाठी कार्यकर्त्यांनी श्री. राम नेवले, सौ. सरोज काशीकर, श्री. रघुनाथराव पाटील, श्री. शंकर धोंडगे व श्री. पुरुषोत्तम लाहोटी यांची नावे सुचविली. नावे मागे घेण्याच्या मुदतीत श्री. शंकर धोंडगे यांच्या व्यतिरिक्त इतरांनी आपली नावे मागे घेतली. अध्यक्ष म्हणून श्री. शंकर धोंडगे यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहिर करण्यात आले. शेतकरी महिला आघाडीच्या अध्यक्षपदासाठी सौ. इंदिराबाई पाटील यांचे एकच नाव सुचविण्यात आले. त्यामुळे त्यांचीही निवड बिनविरोध झाल्याचे घोषित करण्यात आले. या निवडणुकीनंतर श्री. पाशा पटेल आणि सौ. सरोज काशीकर यांनी आपल्या कारकीर्दीतील अनुभव कथन करून नव्याने निवडून आलेल्या अध्यक्षांना सर्वतोपरी सहकार्य करण्याचा शब्द देऊन अध्यक्षपदांची सूत्रे त्यांच्या हवाली केली. श्री. शरद जोशी यांनी यावेळी भाषण करून दोन्ही मावळत्या अध्यक्षांच्या कारकीर्दीचा आढावा घेऊन त्यांचा यथोचित गौरव केला व नवनिर्वाचित अध्यक्षांच्या कर्तृत्वाची माहिती देऊन त्यांचे स्वागत केले.

या बैठकीचे तिसरे सत्र ४ जून रोजी सकाळी ९ वाजता सुरू झाले. या सत्रात शेतकरी संघटनेच्या पुढील कार्यक्रमांची आखणी करण्याचा विषय होता. आज राज्यावर आलेले सरकार अगदीच नवे असल्याने त्यांना त्यांचे कर्तृत्व दाखवायला थोडा वेळ देणे आवश्यक असल्याने इतक्यात आंदोलनाचा कार्यक्रम हाती घेणे योग्य होणार नाही याची नोंद घेऊन शेतकरी संघटनेच्या विचारांच्या प्रसाराचे व प्रशिक्षणाचे कार्यक्रम हाती घेण्याचे ठरले. प्रसाराच्या दृष्टीने वर्तमानपत्र, पुस्तक - प्रकाशने, कलापथके, रेडिओ-टेलिव्हिजनसारखी माध्यमे यांबाबत चर्चा होऊन त्याबाबत निश्चित प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम कार्यकर्त्यांवर सोपविण्यात आले. आंबेठाण येथील कृषि अर्थ प्रबोधिनीमधील शिबिरे पुन्हा सुरू करण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यत

## अध्यक्ष शंकर धोंडगे

३/४ जून १९९५ रोजी अंगारमळा येथे भरलेल्या शेतकरी संघटना व शेतकरी महिला आघाडीच्या विस्तारीत कार्यकारिणीने शेतकरी संघटनेचे अध्यक्ष म्हणून श्री. शंकर धोंडगे यांची बिनविरोध निवड केली. त्याचे कौतुक करताना श्री. शरद जोशी म्हणाले की, 'दुसऱ्यांदा अध्यक्ष बनणारा शंकर हा पहिलाच कार्यकर्ता आहे.'

खरं तर काही माणसं जन्मजातच एखादं पद बरोबर घेऊन येत असावीत. शंकर धोंडगेंचा जन्मच अध्यक्ष होण्यासाठी झाला असावा असे वाटावे अशी त्यांची कार्यपद्धती आहे.

शंकर धोंडगे १९८९ साली शेतकरी संघटनेचे पहिल्यांदा अध्यक्ष झाले, ती बातमी त्यांच्या वडिलांना सांगायला गेलेल्या कार्यकर्त्यांना त्यांच्या वडिलांना चक्क म्हटले 'म्हणजे आतापर्यंत काय होता? मला वाटायचं अध्यक्षच आहे!'

शंकर धोंडगेंच्या पहिल्या अध्यक्षपदाच्या काळात शेतकरी संघटनेचे अधिवेशन नाही झाले. पण, ते नांदेड अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष होते, १९९६ साली नांदेडला त्यांनी शरद जोशींच्या अनुपस्थितीत प्रचंड विभागीय परिषद भरविली होती, जिच्यामध्ये पुरुषांच्या बरोबरीने स्त्रिया हजर होत्या. त्यांच्या अध्यक्षपदाच्या काळात शेगावचा मेळावा झाला, सेवाग्रामचा महामेळावा झाला. अध्यक्ष व्हायच्या आधी दिल्लीच्या मेळाव्याच्या तयारीसाठी त्यांनी दिल्लीत तळ ठोकला होता.

शंकर धोंडगे हे एक समूहाचे नाव आहे. शंकर धोंडगेंनी जबाबदारी स्वीकारलेले काम कितीही मोठे असो, ते व्यवस्थित पार पडते आणि ते पार पडत असतांना शंकर धोंडगे या व्यक्तीची कुठेही धावपळ चाललेली दिसत नाही अगदी स्थिरचित्ताने ते काम होतांना ती पाहात असते.

गेल्या वर्ष दीड वर्षात नांदेड जिल्ह्यातील काही अपवाद वगळता सर्व गावे बळिराज्य गावे झाली आहेत. हे 'शंकर धोंडगे' या समूहाचे यश आहे.

महाराष्ट्र विधानसभेच्या मागील निवडणुकीतील घोर अपयशाला काही अंशी कारणीभूत ठरलेली शेतकरी संघटनेतील मरगळ दूर करून शेतकरी संघटनेला भरारी मारण्याचे बळ बांधण्यात शंकर धोंडगे निश्चित यशस्वी होतील.

आला. या शिबिरांसाठी अभ्यासक्रम ठरविणे, शिबिरांचा कार्यक्रम ठरविणे व शिबिरांसाठी प्रशिक्षक म्हणून कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देणे यासाठी १८/१९/२० जून रोजी आंबेठाण येथील कृषि अर्थ प्रबोधिनीत काही प्रमुख कार्यकर्त्यांचे शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सप्टेंबर १९९५ पर्यंतच्या कामकाजावर बारकाईने लक्ष ठेवून त्याची नोंद ठेवण्याचे ठरले. सप्टेंबर ९५ नंतर, आवश्यकता भासल्यास आंदोलनाचा कार्यक्रम आखला जाईल.

दरम्यानच्या काळात, पुन्हा एकदा लक्ष्मीमुक्तीचा कार्यक्रम व्यापक स्वरूपात अमलात आणण्याचे ठरविण्यात आले.

विस्तारित कार्यकारिणीची ही बैठक ४ जून रोजी दुपारी १ वाजता विसर्जित झाली.

ही बैठक म्हटले तर कामकाजाची बैठक होती किंवा म्हटले तर स्नेहसंमेलन होते. बैठकीच्या शेवटी शरद जोशींनी आपल्या या सर्व स्नेही मंडळींना स्नेहभोजन दिले. प्रयोजन होते, त्यांची धाकटी लेक गौरी हीचे लग्न. गौरीचे लग्न १९ फेब्रुवारी ९५ रोजी अमेरिकेमध्ये झाले, त्यावेळी शरद जोशी गुजरातमध्ये निवडणूक प्रचार दौऱ्यावर होते; ते स्वतः लग्नाला जाऊ शकले नाहीत.

## अध्यक्षा सौ. इंदिराबाई भानुदास पाटील

हिंगोली येथे झालेल्या शेतकरी महिला आघाडीच्या शिबिरात स्त्रीला संपत्ती अधिकार मिळविण्यासाठी एक प्रयोग ठरविण्यात आला. त्यावर शेतकरी महिला आघाडीच्या अमरावती अधिवेशनात ठरावाने शिक्कामोर्तब झाले. त्याचबरोबर अमरावती अधिवेशनाने 'जोतिबा गावा'ची योजनाही पुढे ठेवली. ज्या गावातील दारूचे दुकान बंद होईल, स्त्रियांना संपत्ती अधिकार असेल व गावची विकास कामे स्त्रियांच्या समस्या सोडविण्याचे ध्येय समोर ठेवून होतील त्या गावाला 'जोतिबा गाव' असा पुरस्कार देण्याची ही योजना होती.

फुले-आंबेडकर विचार यात्रेच्या समारोप समारंभात तत्कालीन प्रधानमंत्री श्री. विश्वनाथ प्रतापसिंग यांच्या हस्ते सौ. इंदिराबाई पाटील यांनी चोपडा तालुक्यातील विटनेर गावाच्या वतीने 'जोतिबा गाव' हा पुरस्कार स्वीकारला. गावची ग्रामपंचायत सर्व महिला सदस्यांची बनवून विकास कामांना स्त्रियांच्या समस्या सोडविण्याच्या बाजूला वळविण्याचे उद्दिष्ट विटनेर गावाने गाठले. गावातील शंभर स्त्रियांना, नुसती तोंडी नव्हे, तर सातबाराच्या उताऱ्याच्या रूपाने कागदोपत्री जमिनीची मालकी मिळवून दिली. गावात दारू दुकान नाही, पण पुढेही असू नये असा ग्रामपंचायतीने ठराव केला. इंदिराबाईंनी गाव 'जोतिबा गाव' पुरस्कारास पात्र केला.

याच इंदिराबाई आज शेतकरी महिला आघाडीच्या अध्यक्षा झाल्या आहेत. त्यांच्या या जबाबदारीत त्यांचे पती श्री. भानुदास पाटील त्यांना पूर्वीप्रमाणेच साथ देतील याची इंदिराबाईंना साभिमान खात्री आहे.

अध्यक्षपदाचा आधार मिळाल्याने आता इंदिराबाई शेतकरी संघटनेच्या पुरुष कार्यकर्त्यांना शेतकरी महिला आघाडीच्या कामाबाबत माजी अध्यक्षा सौ. सरोज काशीकर यांच्याप्रमाणेच धाकात ठेवण्याची हिम्मत दाखवतील. लक्ष्मीमुक्ती कार्यक्रमाला निश्चित रूप देणाऱ्या इंदिराबाई लक्ष्मीमुक्ती कार्यक्रम अधिक व्यापक करण्यात यशस्वी होवोत.

**मनोगत**

## पूर्वीच्या बैठका 'कार्यकर्त्यां'च्या असायच्या

स. न. वि. वि.

३/४ तारखेच्या बैठकीस येण्याची अत्यंत इच्छा असूनही येऊ शकलो नाही. वास्तविक केव्हा एकदा साहेबांना भेटायला मिळेल असे झाले होते. केव्हा एकदा मिटिंग ठरते याची वाटच पहात होतो. अकारण मध्येच येऊन साहेबांच्या विश्रांती काळात त्यांना त्रास होऊ नये एवढ्याकरिताच थांबलो होतो पण एकूण योग नव्हताच.

निवडणुकांचे निकाल अनपेक्षित अन् धक्कादायक वाटले तरी आपल्या विचारांवर विश्वास ठेवून काम करणाऱ्या कार्यकर्त्यांस पचविणे जड जाऊ नये असे वाटते. अर्थात घर दार सगळं सोडून राब राब राबलेला कार्यकर्ता काही काळाकरिता बधिर होऊन जाईल हे खरं आहे. निवडणुकीच्या पराभवाची मीमांसा अनेकांनी केलेली वाचली तरी आपल्या हातात "सामना" प्रमाणे एखादे प्रभावी वर्तमानपत्र असते तरी पुष्कळ फरक पडू शकला असता. निदान १२/१५ सीटस् आपण मिळवू शकलो असतो असे वाटते.

अलिकडच्या काही बैठकांमध्ये कपड्यांच्या कांजीबरोबर नको तेवढी आत्मसंतुष्टता आपल्या काही कार्यकर्त्यांत आली की काय अशी एक शंका मात्र गेल्या वर्ष दीड वर्षात यायला लागली होती. काही वेळेस तर आपल्या वरिष्ठ कार्यकर्त्यांना आपसांत "तेरी मेरी" वर येतानासुद्धा पाहिले आहे. पूर्वीच्या बैठकी ह्या शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांच्या बैठका असायच्या. प्रत्येकजण कशानं तरी भारावलेला झपाटलेला दिसायचा. अलिकडच्या काही बैठकांमध्ये आपण एखाद्या काँग्रेस कल्चर बैठकीत आहोत की काय असे वाटायचे. एका दृष्टीने निवडणुकीचे निकाल लागले ते बरे लागले. ही एक इष्टापत्तीच ठरून परत एकदा कार्यकर्त्यांना चाळण लागली तर ती हवीच आहे.

**बाबुभाई जैन,**
अलिबाग, जि. रायगड.

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On 21st June, 1995

To

**SHETKARI SANGHATAK**
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
June 21, 1995

**PNCW 281**
Licence to post without prepayment
**No. 87**

## महिला आघाडी

**सौ. इंदिरा भानुदास पाटील**
पंकजनगर, चोपडा,
जि. जळगांव.

शेतकरी भावानो,
स. न. वि. वि.

आंबेठाण येथे ३/४ जून १९९५ रोजी झालेल्या शेतकरी संघटना व शेतकरी महिला आघाडीच्या विस्तारित कार्यकारिणीने शेतकरी महिला आघाडीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी माझ्यावर सोपवली आहे. तुमच्या व शेतकरी महिला आघाडीच्या सर्व कार्यकर्त्या बहिणींच्या भरवशावर मी ही जबाबदारी स्वीकारली आहे. शेतकरी महिला आघाडीच्या या आधीच्या सर्व अध्यक्षा भगिनींनी वाढविलेला हा वेल आणखी वाढवून फळाफुलाला आणण्याचे काम आपल्याला करायचे आहे. म्हणून पद स्वीकारल्या स्वीकारल्या तुम्हा सर्वांना ही विनंती करीत आहे.

१) **लक्ष्मीमुक्ती** : महाराष्ट्रात दोन लाखांहून अधिक स्त्रीयांच्या नावावर जमिनी या कार्यक्रमाने करण्यात आल्या आहेत. जमिनीची मालकी प्राप्त करणाऱ्या महिलांची संख्या आता आपल्याला अधिक वेगाने वाढविली पाहिजे. त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे, ही मालकी नुसती नावापुरती असून चालणार नाही. या जमिनीतून येणाऱ्या उत्पन्नावर त्या त्या बहिणीचा निर्विवाद अधिकार असल्याखेरीज आपल्या या कार्यक्रमाचा उद्देश सफल होणार नाही. त्या दृष्टीने या आधी जेथे जेथे लक्ष्मीमुक्तीने महिलांच्या नावे जमिनी झाल्या आहेत त्यातील उत्पन्न आपल्या मनाने खर्च करण्यासाठी त्या महिलेच्या हाती पडू लागले आहे किंवा नाही याची पाहाणी करून त्याची माहिती वरील पत्त्यावर पाठवावी ही विनंती.

२) **दारूदुकान बंदी** : शेतकरी महिला आघाडीचे हे आंदोलन हेही एक विशेष आंदोलन आहे. पूर्वी ज्या ठिकाणी महिला आघाडीने हे आंदोलन करून दारू दुकाने बंद पाडली आहेत ती परत चालू झाली असल्यास ती पुन्हा बंद करण्यास शेतकरी महिला आघाडीला सहकार्य करावे ही विनंती. तसेच कोठेही नवीन दारू दुकाने उघडू पाहात असतील तर त्यांनाही अटकाव करावा.

३) **माजघर शेती** : खुल्या अर्थव्यवस्थेचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचावा यासाठी 'शिवार'तर्फे जिल्ह्याजिल्ह्यात 'सुपर मार्केट' सुरू होऊ लागली आहेत. शेतीमालापासून बनलेले अनेक प्रकारचे खाद्य पदार्थ व इतर वापराच्या वस्तू, कलावस्तू यांना या 'सुपर मार्केट'मधून वाव देण्याचा 'शिवार' चा उद्देश आहे. या वस्तूंना परदेशी बाजारपेठेतही स्थान मिळवून देण्याचा 'शिवार'चा प्रयत्न राहील. त्या दृष्टीने आपल्या भागातील वैशिष्ट्यपूर्ण खाद्यपदार्थ, वस्तू व्यावसायिक स्वरूपात बनविण्यासाठी महिलांना प्रोत्साहन व मार्गदर्शन द्यावे. याकामी लक्ष्मीमुक्तीने हाती आलेले उत्पन्न भांडवल म्हणून महिला वापरू शकतील.

४) **निर्णय सहभाग** : शेतकरी संघटनेच्या कार्यक्रमात महिलांचा सहभाग हळूहळू कमी होत चालला आहे. तो पुन्हा वाढायला लागेल असा प्रयत्न करावा ही विनंती.

शेतकरी महिला आघाडीच्या कामासंबंधी आपल्या काही सूचना असतील तर त्या वरील पत्त्यावर पाठवाव्यात.

आपण सोपवलेली अध्यक्षपदाची जबाबदारी पार पाडण्यास आपले संपूर्ण सहकार्य मिळेल याची खात्री बाळगते.

आपली बहिण,
**सौ. इंदिरा भानुदास पाटील**
अध्यक्षा, शेतकरी महिला आघाडी.

### कृषि अर्थ प्रबोधिनी प्रशिक्षणार्थी नोंदणी

१९९५ च्या जुलै महिन्यापासून आंबेठाण येथील कृषि अर्थ प्रबोधिनीत शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांसाठी नवीन अभ्यासक्रमानुसार प्रशिक्षण शिबिरे सुरू होत आहेत. या शिबिरात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या कार्यकर्त्यांनी आपल्या नावांची नोंदणी पुढीलप्रमाणे माहिती पाठवून करावी.

संपूर्ण नाव, पत्ता, टेलिफोन नंबर (असल्यास) पूर्वी प्रशिक्षण झाले असल्याच त्याचा तपशील, व्यवसाय, शिक्षण, वय, शिबिरासाठी सोयीस्कर कालावधी.

शिबिरासाठी नोंदलेल्या नावांतून निवड करण्यात येऊन संबंधितांना शिबिराचा कार्यक्रम टपालाने कळविण्यात येईल.

**कृषि अर्थ प्रबोधिनी**
**अंगारमळा, आंबेठाण.**

**६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.**
**प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता**
**अंगारमळा, मु. पो. आंबेठाण (४१० ५०१)**
**ता. खेड, जि. पुणे.**

**संपादक, मुद्रक, प्रकाशक**
**सुरेशचंद्र म्हात्रे**
**फोन : द्वारा - चाकण ५२३५४/५२४६८**
**एस्.टी.डी.- ०२१३५**

**पाक्षिक शेतकरी संघटक**
**मालक — मोहन बिहारीलाल परदेशी**
**मुद्रण स्थळ — गणेश प्रिंटर्स,**
**६९३, बुधवार पेठ, पुणे - २.**